दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com
वर्ष : ०५ | अंक : ९०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१३ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

**आतील पानात वाचा**

- सार्वभौमत्वावर हल्ला...!
- सर्व शाळा-महाविद्यालयात 'वंदे मातरम' म्हटले जावे !
- बिबट्याला ठार करा या मागणीसाठी विद्यार्थी व ग्राम स्थांचा संताप...

**आजचा सुविचार**

आयुष्यात कुठल्याही परीस्थितीत
सुखी राहण्याचा प्रयत्न करा,
दुःखी राहिल्याने
उद्याचे प्रॉब्लेम सुटणार नाहीयेत उलट
आजचे सुख सुद्धा निघून जाईल...

# दिल्ली स्फोटानंतर मोदी सरकारचा मोठा निर्णय; महत्त्वाचा प्रस्ताव मंजूर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नवी दिल्ली :** केंद्र सरकारनं दिल्ली स्फोटाबद्दल महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाल किल्ल्याजवळ झालेला स्फोट दहशतवादी हल्ला मानण्यात आला आहे. कारमध्ये झालेला स्फोट अतिशय गंभीर दहशतवादी घटना असल्याचं सरकारनं म्हटलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत कॅबिनेटची बैठक झाली. त्यात दिल्ली बॉम्ब स्फोटाबद्दल एक प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

१० नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात एका कारमध्ये झालेला स्फोट दहशतवादी घटना असल्याचं म्हणत केंद्रीय मंत्रिमंडळानं याबद्दल शोक व्यक्त केला. हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या स्मरणार्थ दोन मिनिटं मौन पाळण्यात आलं. मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी एक महत्त्वाचा प्रस्ताव ठेवण्यात आला. दहशतवाद्यांच्या सगळ्या स्वरुपांसंदर्भात भारताचं धोरण शून्य सहिष्णूतेचं असेल, असा उल्लेख प्रस्तावात आहे.

दिल्ली स्फोटाचा तपास अतिशय वेगानं करण्यात यावा, असे आदेश मंत्रिमंडळातून देण्यात आल्याचा उल्लेख प्रस्तावात आहे. 'स्फोटामागे असलेले गुन्हेगार, त्यांचे सहकारी आणि त्यांचे पुरस्कर्ते यांची ओळख पटवण्यात यावी. त्यांना त्वरित न्यायाच्या चौकटीत आणावं. त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करावं. सरकार सर्व परिस्थितीवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवून आहे,' असं प्रस्तावात नमूद करण्यात आलं आहे.



सोमवारी संध्याकाळी सातच्या सुमारास लाल किल्ला मेट्रो स्थानकाच्या जवळ एका हुंडाई आय २० कारमध्ये स्फोट झाला. या स्फोटानंतर आसपासच्या वाहनांनादेखील आग लागली. या स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला, तर २० पेक्षा अधिक जण जखमी झाले. सरकारनं बॉम्ब स्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएकडे सोपवला आहे.

केंद्रीय गृह मंत्री अमित शहांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय बैठक बोलावण्यात आली होती. त्यात बडे अधिकारी सहभागी झाले होते. दिल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोटाच्या तपासाची जबाबदारी एनआयएकडे सोपवण्याचा निर्णय बैठकीत झाला. आज सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी लोक नायक रुग्णालयात गेले होते. तिथे जाऊन त्यांनी स्फोटात जखमी झालेल्यांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. यानंतर रात्री कॅबिनेटची बैठक झाली. दिल्लीतील स्फोटानंतर झालेली कॅबिनेटची ही पहिलीच बैठक आहे.

## केडीएमसीच्या ई वार्डमध्ये कार्यालयीन वेळेत कर्मचाऱ्याचे 'केळवण'

### धक्कादायक प्रकार पाहून नागरिकांचा संताप...



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.११, कल्याण (ठाणे) :** रिजेन्सी एस्टेट येथे असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ई वार्ड कार्यालयात आज कार्यालयीन वेळेत काही कर्मचारी 'केळवण' साजरे करताना दिसले.

कामासाठी आलेल्या नागरिकांना कार्यालयात सरकारी कामकाजाऐवजी घरगुती कार्यक्रम सुरू असल्याचे दृश्य पाहून धक्का बसला.

मनुष्यबळाच्या कमतरतेच्या तक्रारी कायम असताना, कर्मचारी कार्यालयीन वेळेत वैयक्तिक कार्यक्रमात गुंतले असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. या प्रकारावर पालिका प्रशासनाने तत्काळ चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## शालेय बसला टिप्परची जोरदार धडक




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१२, मुदखेड (नांदेड) :** शहरांतील बायपास बसवेश्वर चौकात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परने युनिव्हर्सल इंग्लिश स्कूल मुलांना शाळेत घेऊन जाणाऱ्या उभ्या बसला जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात जवळपास ४० शालेय विद्यार्थी सुदैवाने बचावले असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून बेसुमार वाळू माफियांनी धुमाकूळ घातला आहे.

स्कूल बस क्रमांक एमएच २० डीडी ०१०५ मुदखेड बायपास बसवेश्वर चौकात उभी होती, बारड कडून भरधाव वेगात येणाऱ्या टिप्पर क्रमांक एमएच २६ एडी ११६८ ने जोराची धडक दिली. या बसमध्ये शालेय लहान मुले मुली ४० च्या जवळपास प्रवास करीत होते, यामध्ये जीवित हानी झाली नसली तरीही स्कूलबस समोरच्या काचा फुटल्या असून, चालक किरकोळ जखमी झाला आहे, यानंतर चालक मात्र घटना स्थळावरून पळ काढत असताना स्थानिक नागरिकांनी रोखले आहे. याप्रकरणी बस चालक फिर्यादी पंडित राठोड यांच्या तक्रारीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

## विमानतळ पोलिसांची मोठी कारवाई ! १४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.१२, पुणे :** विमानतळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घरफोडी व चोरीच्या मालम त्तेचा मोठा तपास उघड करत तब्बल १४ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिसांनी रेकॉर्डवरील सराईत आरोपींना गजाआड करत एकूण ८ गुन्ह्यांचा छडा लावला आहे.

पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करत सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शिवम दत्ता अवचर (१९, नऱ्हे), नवनाथ उर्फ लखन बाळु मोहिते (२२, हडपसर) आणि एका १६ वर्षीय विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेतले. या आरोपींकडून एकूण १२ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम, तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तपासात उघड झाले की आरोपींनी विमानतळ पोलीस ठाणे हद्दीत बंद घरे, दुकाने फोडून चोरी केल्या होत्या. पोलिसांच्या तांत्रिक तपासामुळे आणि सीसीटीव्ही विश्लेषणामुळे आरोपी ओळख पटली. अखेर सापळा रचून तिन्ही आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले.विमानतळ पोलिसांच्या या यशस्वी कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना निम र्ण झाली आहे.

सदर कारवाई पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुम ार शर्मा, अपर पोलिस आयुक्त मनोज




पाटील, उपायुक्त सोमय मुंडे, सहाय्यक पोलिस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोविंद जाधव, गुन्हे निरीक्षक शरद शेळके यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक मनोज बरुरे, नितीन राठोड, तसेच पोलीस कर्मचारी योगेश थोपटे, ज्ञानदेव आवारी, लालु क-हे, हरीप्रसाद पुंडे व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## कार्तिकी यात्रेच्या दरम्यान पिंपरी चिंचवड हादरले ! मित्रांनीच मित्राचा घात केला !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, चऱ्होली (पुणे) :** पुण्यात गुन्हेगारी काही केल्या कमी होताना दिसत नाहीय. कारण पिंपरी चिंचवड शहर आज गोळीबाराच्या घटनेने हादरलं आहे. पिंपरी चिंचवडच्या चऱ्होली अलंकापुरम चौकाजवळ गोळीबार झाल्याची माहिती समोर येत आहे. या गोळीबारात एक जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत होती. पण आता आलेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला होता, अशी माहिती आता समोर येत आहे. या गोळीबारात एक ते दोन राऊंड फायर करण्यात आल्याची माहिती आहे. या गोळीबारात नितीन गिलबिले नावाच्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. गोळीबारानंतर त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घोषणा करण्यात आल्याची माहिती आहे.

विशेष म्हणजे नितीन गिलबिले यांच्या मित्रांनीच त्यांना संपवल्याची माहिती आता समोर येत आहे. मित्रांनी मित्राच्या डोक्यात गोळी झाडून हत्या केली आहे. ही घटना आळंदी दिघी रोडवर घडली आहे. नितीन गिलबिलेंचा जागीच मृत्यू झाला आहे. संशयित आरोपी अमित पठारे आणि विक्रांत ठाकूरचा शोध दिघी पोलीस घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी सहाच्या सुमारास मयत नितीन गिलबिले, अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर हे आळंदी दिघी रस्त्याच्या कडेला चारचाकी गाडी लावून आत बसले होते. ते एकमेकांसोबत गप्पा मारत होते. त्यापैकी, अमित पठारे आणि विक्रांतने



त्यांच्या जवळील पिस्तूल काढून नितीन गिलबिलेंच्या डोक्यात गोळी झाडली. यात नितीनचा जागीच मृत्यू झाला आहे.

ही घटना सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. संशयित आरोपी अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर पसार झाले आहेत. त्यांचा शोध दिघी पोलीस घेत आहेत. घटनास्थळी दिघी पोलीस आणि गुन्हे पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांनी धाव घेतली होती. अद्याप हत्येचं कारण समजू शकलेलं नाही. या प्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.

**गोळीबारामागील कारण काय?**

जागेच्या प्लॉटिंगच्या व्यवसायाच्या कारणामुळे हा गोळीबार झाला असल्याची प्राथमिक माहिती आहे. मृतक नितीन गिलबिले आणि आरोपी मित्र अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर यांच्याकडून हा गोळीबार करण्यात आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तीनही मित्र जमिनीच्या प्लॉटिंगचा व्यवसाय करत होते. याच व्यवसायामधील व्यवहाराच्या वादातून हा गोळीबार केला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## शिर्डीत रंगणार उद्यापासून राज्य कॅडेट तायक्वांदो स्पर्धा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, अहिल्यानगर :** आठवी राज्य कॅडेट तायक्वांदो स्पर्धा शिर्डीत रंगणार असून,क्युरोगी आणि पूमसे प्रकारात ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडू सहभागी होणार असल्याची माहिती राज्याचे अध्यक्ष डॉ.अविनाश बारगजे यांनी दिली.

तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने तायक्वांदो असोसिएशन महाराष्ट्र, मुंबई यांच्यातर्फे शिर्डी येथील सिल्वर ओक मंगल कार्यालयात आठवी राज्य कॅडेट तायक्वांदो क्युरोगी आणि पूमसे स्पर्धा २०२५ आयोजित केली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (ता.१४) डॉ.सुजय विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे,तसेच ज्येष्ठ पत्रकार जयंत गायकवाड उपस्थित राहणार आहेत. राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचा मुले-मुलींचा संघातील




जवळपास २५० खेळाडू सहभागी होणार असून, यातील सुवर्णपदक विजेत्यांचा राज्याचा संघ निवडण्यात येणार आहे. हा संघ पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणार आहे.

सदर स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा तायक्वांदो असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभत आहे. यावेळी राज्य संघटनेचे महासचिव मिलिंद पठारे, खजिनदार व्यंकटेश कररा, पदाधिकारी सुभाष पाटील, निरज बोरसे, धुलीचंद मेश्राम, प्रवीण बोरसे, अजित घारगे, सतीश खेमसकर आदी उपस्थित राहणार आहेत.

## संपादकीय

### तिसऱ्या डोळ्याचे काय?

कुठेही जा, पळसाला पाने तीनच,' अशा शब्दांत राज्यातील मराठी शाळांच्या सद्यस्थितीचे वर्णन करता येईल. सरकार वा शिक्षण विभागाच्या माध्यमातून या संस्थांना सावरण्याऐवजी, त्यांना उखडण्याचे प्रयत्न होत आहेत की काय, अशी शंका येते. खुद्द शिक्षणमंत्र्यांच्या नाशिक जिल्ह्यातच तशी वारंवार प्रचीती येत असेल तर यास काय म्हणावे? नाशिक महापालिकेची बी. डी. भालेकर शाळा अखेरच्या घटका मोजते आहे. तेथे शाळाच उभारण्याऐवजी अधिकाऱ्यांसाठी विश्रामगृह बांधण्याचा डाव आहे. काही स्वयंसेवी संस्था आणि सजग नागरिकांनी शाळेच्या प्रवेशद्वारावर आठवडाभर ठिय्या देऊन पाहिला, माजी विद्यार्थ्यांनी टाहो फोडला, तरी अधिकारी ढिम्मच. दोन-दोन मंत्र्यांनी तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतरही निर्णय होत नाही. अधिकारी त्यांचे ऐकत नसावेत, वा दोघे मिळून सामान्यांना मूर्खात काढत असावेत! शासन प्रशासनाला चालवते आहे की प्रशासन शासनाला, हे कळत नाही. परिणामी, शिक्षणाचा वारसा धुळीस मिळून भालेकर शाळेच्या जागी अधिकाऱ्यांसाठी टोलेजंग विश्रामगृह वा निवासस्थाने दिसून येतील, एवढे नक्की!

शिक्षण खात्यातील अनागोंदी आणि अधिकाऱ्यांच्या असंवेदनशील कारभाराचा प्रत्यय जिल्ह्यात अन्य ठिकाणीही येत आहे. जानोरी (ता. दिंडोरी) आणि कुंभारी (ता. निफाड) येथील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना एखाद्या उद्योगातील असंघटित कामगारांप्रमाणे उठाव करावा लागणे, संपावर जावे लागणे हे कशाचे द्योतक? सर्जनशील, तंत्रस्नेही शिक्षक मिळावेत, असा या विद्यार्थ्यांचा आग्रह. प्रत्यक्षात निवृत्तीच्या उंबरठ्यावरील 'संवर्ग-१'मधील गुरुजन नेमण्यात आले. पुढील चार-दोन महिन्यांनी वर्गांवर शिक्षकच नसतील. मग पहिली ते सातवीचे वर्ग एकत्र बसविले जाऊन गिरवलेल्या मुळाक्षरांचा विसर पडतो की काय, या भीतीपोटी सुमारे अडीचशे मुलांनी शाळेवर बहिष्कार घातला.

कुंभारीतील विद्यार्थ्यांची व्यथा आणखी वेगळी. मुलांना शिक्षणाची गोडी लावून शाळेला नावारूपाला आणणारे, 'मुख्यमंत्री माझी शाळा' उपक्रमात चमकदार कामगिरी करणारे रमाकांत शिंदे वा त्यांच्यासारखे उपक्रमशील मुख्याध्यापक त्यांना हवे आहेत. परंतु, या शिक्षकांच्या कल्पकतेचा लाभ इतर संस्थांनाही व्हावा म्हणून की काय, प्रशासनाने त्यांची बदली केली. जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या हे आजवर न सुटलेले कोडे. त्यास चिकटलेले आर्थिक देवाणघेवाणीचे आरोप आणि वाद वर्षानुवर्षे सुटायला तयार नाहीत. यात दरवर्षी हजारो विद्यार्थी हकनाक भरडले जातात. तरी याच्याशी काही देणेघेणे नसल्यासारखे शिक्षण विभागाचे वागणे अनाकलनीयच! लाखात एखादेच डिसले गुरुजी किंवा रमाकांत शिंदे असतात. त्यांच्याही पदरी उपेक्षाच येत असते. या घटना कमी की काय, सटाण्यात आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थिनींना चक्क मोर्चा काढावा लागला. गृहपाल व इतर कर्मचारी दुर्लक्ष करीत असल्याचा, अपमानास्पद वागणूक देत असल्याचा त्यांचा आरोप. अनेकदा तक्रारी करूनही प्रशासन हलत नव्हते. शेवटी रविवारी सुटीच्या दिवशी भल्या सकाळच्या थंडीत पन्नासहून अधिक मुलींनी पायपीट करून थेट आदिवासी प्रकल्प कार्यालय गाठले. कैफियत मांडल्यानंतर यंत्रणा हलली. आमदारांपासून सारेच खडबडून जागे झाले. हीच तत्परता मुलींना तक्रार केल्या केल्या दाखवली गेली असती, तर कदाचित संस्था आणि विभागाची बदनामी टळली असती.

गोरगरिबांच्या मुलांना सरकारी शाळांतून शिकून सवरून शहाणे व्हायचे आहे; पण काही घटकांना तसे होऊ द्यायचे नाही, असा या चारही प्रसंगांतून अर्थ काढला गेल्यास तो चुकीचा कसा म्हणावा? गावपातळीवर शिकून मोठे झालेले अनेक जण मंत्रालयात बसून कारभार हाकत आहेत. तरी सरकारी शाळांवर ही वेळ येणे दुर्दैवी! दीनदुबळ्यांच्या शिक्षणासाठी आयुष्य वेचणारे महात्मा फुले शिक्षणाला 'तिसरा डोळा' म्हणत. त्या डोळ्यावर घाव घालून उपेक्षित वर्गाला अंधकारात ढकलण्याचे पातक तर पुरोगामी महाराष्ट्रात घडत नाही ना, हे एकदा तपासून पाहायला हवे.

# भक्तांना संसारात राहून साधना करायला शिकवणारे प.पू. भक्तराज महाराज !

महाराष्ट्र ही अवतारांची आणि साधू संतांची भूमी. या भूमीत अनेक संत महात्मे होऊन गेले. त्यांनी दिलेल्या शिकवणीकीतून, प्रवचनांतून, लिहिलेल्या भजनांतून आणि ग्रंथातून बोध घेऊन अनेक अनुयायी निर्माण झाले. या अनुयायांनी समाजाला अध्यात्माची आणि साधनेची गोडी लावली. समाजमनावर साधनेचे महत्व बिंबवले आणि मनुष्यजन्माचे सार्थक कसे करायचे हे जनमानसांत ठसवले. ज्यांनी हे महत्व समजून घेतले त्यांनी मनुष्यजन्माचा उद्धार करून घेतला. याच संतांच्या मांदियाळीतील एक संत म्हणजे प.पू. भक्तराज महाराज. संसारात राहून साधना कशी करावी आणि स्वतःचा उद्धार कसा करून घ्यावा याचे जिवंत उदाहरण म्हणजे प.पू. भक्तराज महाराज. प्रीतीचे सगुण रूप म्हणजे प.पू. भक्तराज महाराज, गुरुसेवेचा परमावधी म्हणजे प.पू. भक्तराज महाराज. अशा या भक्तराज महाराजांचा महानिर्वाण दिन कार्तिक कृष्ण नवमी म्हणजेच १५ नोव्हेंबर २०२५ या दिवशी पुण्यातील जुन्नर तालुक्यातील श्रीक्षेत्र कांदळी(वडगाव) येथे साजरा होत आहे. त्यानिमित्ताने बाबांच्या गुरुसेवेची आणि त्यांच्या कर्तृत्वाची थोडक्यात ओळख करून घेऊया.

बाबांचा (प.पू. भक्तराज महाराज यांचा) जन्म अत्यंत धार्मिक सामान्य ब्राह्मण प्रतिष्ठित कुळात झाला. श्रीराम हे त्यांचे कुलदैवत ! लहानपणापासूनच भगवत्प्रेमाने त्यांना आकर्षित केले. त्यांच्या हृदयात भक्तीज्योत सदैव तेवत राहिली, परिणामस्वरूप 'धार्मिक कार्यात सातत्याने भाग घेणे आणि भजन, श्रवण, गरिबांना साहाय्य करणे', हा त्यांचा आवडता छंद आणि स्वभाव बनला. शिक्षण पूर्ण होताच परिस्थितीवश त्यांनी नोकरी शोधण्याचे काम आरंभ केले. नोकरी मिळेपर्यंत स्वस्थ न बसता त्यांनी लहान-सहान कामे करून व्यवसाय वाढवला; पण नियतीला हे मान्य नव्हते. 'कुशाग्र बुद्धी, वाक्पटूता, त्वरित अचूक निर्णय घेणे', या गुणांमुळे हे बालक असामान्य झाले. यामुळे सगळेच त्यांच्याशी आदरभाव ठेवून वागत असत. त्यांची लहानपणापासूनच धार्मिक आणि आध्यात्मिक साधनेची वृत्ती असल्यामुळे त्यांना 'श्री गुरुचरित्र'वाचनाचा छंद जडला. विपत्तीकाळातही त्यांची साधना यथागत चालूच होती. त्यामुळे त्यांची गुरुप्राप्तीची ओढ दिवसेंदिवस वाढत गेली. त्याच दरम्यान प.पू. श्रीशामसाईबाबांनी (हे साईबाबांचे शिष्य होते आणि त्यांच्याच आदेशानुसार त्यांच्या मोरटक्का आश्रमात राहून जनसेवा करत होते.) बाबांना साईभक्ती वाढवण्यासाठी मार्गदर्शन करून प्रोत्साहित केले. १५.२.१९५६ या दिवशी श्री अनंतानंद साईश यांनी बाबांना नर्मदामैय्याच्या साक्षीने गुरुमंत्र दिला. शिष्य असतांना गुरु वहाणा न घालता बाहेर जायला निघाले की, लगेच त्यांच्या वहाणा काखेत धरून त्यांच्या पाठी अनवाणी चालणे, धावणे, धावताना पायात काटा रुतून पाय रक्तबंबाल झाला तरी त्याकडे दुर्लक्ष करणे, भजनांच्या कार्यक्रमात 'गुरूंनी उठण्यास सांगितले नाही'; म्हणून सलग ८ – १० तास भजने म्हणणे, गुरूंसमोर तासन्तास एका पायावर उभे राहून भजने म्हणणे, रात्री गुरूंच्या झोपण्याच्या वेळी त्यांनी 'थांब' म्हणेपर्यंत अखंडपणे त्यांचे पाय चेपत



राहणे, यांसारख्या बाबांच्या गुरुसेवेला तोड नाही. बाबांनी अशा गुरुसेवेतून शिष्यत्वाचा मोठा आदर्शच आपल्या सर्वांसमोर ठेवला आहे.

प.पू. बाबा म्हणायचे, 'भजन हेच माझे जीवन आहे.' बाबांच्या भजनांचे वैशिष्ट्य हे की, आज इतक्या वर्षांनंतरही प्रत्येक साधकाला प्रत्येक प्रसंगात त्या भजनांतून त्याच्या साधनेसाठी आवश्यक असलेला अर्थ उलगडतो ! यासाठीच 'बाबांची भजने', हा अनमोल असा प्रासादिक ठेवाच आहे. बाबांनी भजनांच्या माध्यमातून केवळ भक्तीयोगाचीच नव्हे, तर नामसंकीर्तनयोग, कर्मयोग, ज्ञानयोग आदी साधनामार्गांचीही शिकवण दिली. भक्तांना सत्संग आणि आनंद मिळावा अन् त्यांना साधनेसाठी मार्गदर्शन व्हावे, यांसाठी ऊन-पाऊस, वादळ-वारा आदी कशाचीही पर्वा न करता आणि प्रसंगी आजारपण असतांनाही प.पू. बाबा अनेक किलोमीटर प्रवास करून भक्तांकडे जात असत. प.पू. बाबांच्या या चैतन्यदायी सहवासाच्या स्मृती आजही भक्तांना भावाने रोमांचित केल्याविना राहात नाहीत. बाबांच्या भजनाचे ऑडिओ आणि व्हिडीओ आजही उपलब्ध आहेत. या भजनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे रचियेते, संगीतकार आणि गायक स्वतः बाबा असल्याने ही भजने चैतन्याने ओतप्रोत भरलेली आहेत.' सर्वसाधारणतः थोर संत-माहात्मे हे जपजाप्य, ध्यानधारणा, समाधी आदींमध्ये व्यस्त राहतात आणि काही वेळ भक्तांना मार्गदर्शन करतात. बाबांना मात्र भक्तांविना चैनच पडायचे नाही, इतके ते भक्तांशी समरस झाले होते. बहुतेक संत केवळ मार्गदर्शनाच्या माध्यमातून भक्तांना शिकवतात. बाबांच्या भक्तांना शिकवण्याच्या नानाविध पद्धती होत्या. ते मार्गदर्शनाच्या माध्यमातून तर शिकवतच; पण सहज वागण्या-बोलण्यातून, गमतीजमती करून, कधी रागावून, तर कधी शिव्या देऊनसुद्धा भक्तांना शिकवत. इतकेच नव्हे, तर कधी भक्तांनी चुका केल्या, तर बाबा त्यांना मारतही असत. असे असले, तरी भक्तांना त्यांच्या रागावण्यात आणि मारण्यात प्रेमाचा ओलावा आणि भक्तांच्या कल्याणाचीच तळमळ जाणवे. यासाठीच आजही बाबांचे नुसते स्मरण केले, तरी भक्तांचे नेत्र भावाश्रूंनी डबडबल्याविना राहत नाहीत.

**(संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग )**

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# सार्वभौमत्वावर हल्ला!

भारताची राजधानी असलेल्या दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी भीषण आत्मघाती हल्ला झाला. एका मोटारीत झालेल्या भीषण स्फोटाने केवळ राजधानीच नव्हे तर संपूर्ण देश हादरला. या भीषण स्फोटात १३ निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला तर २५ हून अधिक नागरिक जबर जखमी झाले. या हल्ल्यानंतर संपूर्ण देशात हाय ॲलर्ट घोषित करण्यात आला. केंद सरकारने या भ्याड हल्ल्याचा तपास एनआयएकडे सोपवला आहे. एनआयए या हल्ल्याचा योग्य तपास करून यामागे कोण आहे हे शोधून काढतीलच पण हा हल्ला पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी घडवला हे शाळकरी मुलेही सांगू शकेल.

मागील काही वर्षापासून शांत असणारे दहशतवादी पुन्हा सक्रिय झाले आहेत हेच या हल्ल्यातून स्पष्ट होते. भारतात दहशतवादी कारवाया करून निष्पाप नागरिकांना टार्गेट करायचे आणि देशात अशांतता माजवायची त्यातूनच देशात धार्मिक दंगली घडवून देशात अराजकता माजवण्याचा दहशतवाद्यांचा मनसुबा आहे. भारतासोबत समरोसमोर युद्ध करून आपण जिंकू शकू नाहीत हे पाकिस्तानला ऑपरेशन सिन्दुर नंतर समजले असेल म्हणूनच त्यांनी पुन्हा एकदा आपला जुना पॅटर्न वापरायला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी दहशतवाद्यांना पुन्हा सक्रिय केले. या हल्ल्याच्या आदल्या दिवशीच तीन शहरांमध्ये रासायनिक हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा महाभयानक कट पोलिसांनी उघडकीस आणला. गुजरात पोलिसांच्या कारवाईपाठोपाठ जम्मू काश्मीर पोलिसांनी दहशतवाद्यांचे जाळे उद्ध्वस्त करून सात जणांना अटक केली. हरियाणातील फरीदाबरमधून तब्बल तीन हजार



किलो आरडीएक्स हस्तगत केले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. सुरक्षा यंत्रणेचे याबाबत कौतुकच करायला हवे. जर ही स्फोटके सापडली नसती आणि दहशतवाद्यांचे मनसुबे यशस्वी झाले असते तर देशात हाहाकार उडाला असता. हरियाणा, जम्मू काश्मीर प्रमाणे दिल्लीतील स्फोट मात्र सुरक्षा यंत्रणेला रोखता आला नाही त्यामुळे निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला. २०११ नंतर पहिल्यांदाच दिल्लीत इतका भीषण हल्ला झाला. हा हल्ला म्हणजे भारतीय सार्वभौमत्वावर केलेला हल्ला आहे म्हणूनच याचा बदला घ्यायला हवा. भारताने या हल्ल्याचा बदला घेऊन दहशतवाद्यांना जशास तसे उत्तर द्यायला हवे. काही महिन्यांपूर्वी दहशतवाद्यांनी पहलगाम येथे अशाच प्रकारे निष्पाप नागरिकांना टार्गेट करून जीवे मारले. त्यानंतर भारताने पाकिस्तामात घुसून दहशतवाद्यांची तळे उद्ध्वस्त केली आणि १०० हून अधिक दहशतवाद्यांना ढगात पाठवले. कदाचित त्यामुळेच चवताळलेल्या दहशतवाद्यांनी देशात दहशतवादी कारवायांना सुरुवात केली असेल. अर्थात दहशतवाद्यांना याचीही शिक्षा मिळणार यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर राबवून भारतीय सैन्याने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला भविष्यात ऑपरेशन सिन्दुर पार्ट २ राबवून दिल्ली हल्ल्याचाही बदला घेतला जाईल. सरकार त्यांचे काम करेलच पण आता नागरिकांचीही जबाबदारी वाढली आहे. आपल्या शहरात, परिसरात काही संशयास्पद गोष्टी घडत असल्याची शंका जरी नागरिकांना आली तरी नागरिकांनी पोलिसांना त्याची माहिती द्यावी. दहशतवाद्यांचे स्लीपर सेल शहाराशहरात अस्तित्वात असण्याची शक्यता आहे.

जर अशाप्रकारे कोणता व्यक्ती किंवा संघटना संशपस्पद कृत्य करताना आढळले तर त्याची सूचना पोलिसांना द्यावी. कोणत्याही बेवारस वस्तूंना हात लावू नये. बेवारस वस्तू जर आढळल्या तर त्याचीही सूचना पोलिसांना द्यावी. नागरिकांनी सतर्क राहिल्यास दहशतवाद्यांचे मनसुबे सफल होणार नाहीत. दहशतवादी म्हणजे माणुसकीचे शत्रू आहेत. माणुसकीच्या शत्रूंना नामोहरण करण्याची जबाबदारी जितकी सरकारची आहे तितकीच नागरिकांचीही आहे.

**- श्याम ठाणेदार**

**दौंड जिल्हा पुणे**

**९९२२५४६२९५**

### शाई डाग..

अंगावर फेकतात
कुणी तरी ती शाई
डाग पुसले जरीही
व्रणधुतला न जाई

खोलवर हो जखम
करुनजाती कसाई
जागवतोआठवणी
डागपडला कसाही

कशी घडली घटना
चर्चा चाले ठाईठाई
चघळतराही सगळे
चटपटीत ही खट्टाई

कमवले ते गमावले
ते चारित्र हनन होई
एकअदृश्य तलवार
कायम स्वरुपी डोई

खरोखर जोचुकला
बरोबर तया धुलाई
शिक्षा मार्ग कसाही
जरुरी असे कल्हाई

कधी निर्दोष असून
अंगलट येते भलाई
फाटून जाणार अब्रू
कितीहीकर शिलाई

मार झोड ना करता
मनाची होते पिटाई
सोसवेना टिकामार
सोडवा माई विठाई

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# सर्व शाळा-महाविद्यालयात 'वंदे मातरम' म्हटले जावे !

'वन्दे मातरम' या राष्ट्रीय गीताच्या वादाच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालये यांमध्ये 'वन्दे मातरम्' म्हणणे बंधनकारक करणार असल्याची घोषणा केली. पत्रकारांशी बोलतांना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, जर देशाच्या अखंडतेवर आघात करण्यासाठी कुणी महंमद अली जिनाइशण सारखा उदयास आला, तर त्याला दफन केले जाईल. देशात पुन्हा फाळणी होण्याची स्थिती निर्माण होऊ देऊ नये. आज भाषा आणि जात यांच्या नावाखाली फाळणी करण्याचा प्रयत्न होत आहे; परंतु कोणताही धर्म किंवा मत राष्ट्रापेक्षा मोठे असू शकत नाही.' संविधानाने समस्त भारतीयांना उपासना आणि धर्मस्वातंत्र्य दिले असले, तरी जिथे राष्ट्राचा विषय येतो तिथे धार्मिक अधिकार वगैरे दुय्यम ठरतात. राष्ट्रहिताच्या निर्णयात धार्मिक बाबींनी नाक खुपसू नये हा सरळ साधारण नियम आहे. असे असताना काही कट्टरपंथीय नेते 'वंदे मातरम'ला नाहक विरोध करताना दिसत आहेत.

स्वातंत्र्यलढ्यात 'वंदे मातरम' ही क्रांतिकारकांची प्रमुख घोषणा होती. देशप्रेमी नागरिकांचा उर भरून आणणारी ही घोषणा त्याकाळी क्रांतीकारकांना मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढण्याचे बळ देत होती, त्यांच्यात वीरश्री निर्माण करत होती, त्यांना क्रांतीची प्रेरणा देत होती. शेकडो क्रांतिकारक त्यावेळी 'वंदे मातरम' चा घोष करत हसत हसत बलीवेदीवर चढले, कितीतरी वीरांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या, कारागृहात मरणप्राय यातना सहन केल्या. ज्यामध्ये केवळ हिंदूच नव्हे, तर कितीतरी मुस्लिम क्रांतिकारकांचाही सहभाग होता. वंदे मातरम घोषणेला त्याकाळी कुणीही आक्षेप घेतला नसताना आज या गीताला विरोध का ? असाही प्रश्न यनिमित्ताने राष्ट्रप्रेमी नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. काही कट्टरतावादी नेत्यांनी भारतीय जनता पक्षाला टार्गेट करून भाजप यामाध्यमातून धार्मिक अजेंडा राबवत असल्याचा आरोप केला आहे. राज्यात समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांनी कोणताही मुसलमान 'वंदे मातरम' म्हणू शकत नाही म्हणत वंदे मातरम म्हणण्याच्या निर्णयाला विरोध केला. जम्मू काश्मीरमध्ये मुत्तहिदा मजलिस-ए-उलेमा या कट्टरपंथी संघटनेने 'वंदे मातरम' गीत गैर इस्लामी असल्याचे म्हणत या गीताला विरोध केला आहे, देशात अन्यत्रही कट्टरपंथी संघटना मुस्लिमांना 'वंदे मातरम' न म्हणण्याचे आवाहन करत आहेत. देशासाठी सर्वस्व बहाल करणाऱ्या क्रांतीकारकांना संजीवनी देण्याचे कार्य स्वातंत्र्यपूर्व काळात 'वंदे मातरम' या द्वीअक्षरी मंत्राने केले आहे. हे गीत सर्वप्रथम ७ नोव्हेंबर १८७५ रोजी बंकिमचंद्र यांच्या 'बंगदर्शन' या साहित्यिक मासिकात प्रकाशित झाले. नंतर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८८२ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या गाजलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीत या गीताचा समावेश केला. 'वंदे मातरम्' हे गीत पहिल्यांदा १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कोलकाता अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी गायले होते. १९०५ मध्ये झालेल्या बंगालच्या फाळणी विरोधातील 'स्वदेशी' आंदोलनात हे गीत क्रांतीकारक आणि सामान्य जनतेचा युद्धघोष बनले. देशभरात वंदे मातरम् च्या जयघोषाने ब्रिटीश सत्तेला हादरे दिले. २४ जानेवारी १९५० रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी संविधान सभेत 'वंदे मातरम्' या गीताला राष्ट्रीय गीताचा दर्जा दिला.

राष्ट्रगीताच्या खालोखाल बहुमान असणाऱ्या या प्रेरणा गीताला १५० वर्ष पूर्ण होत आहेत ही स्वातंत्र्याची फळे चाखणाऱ्या समस्त भारतीयांसाठी खरेतर अभिमानाची बाब आहे असे असताना त्याला धार्मिक रंग देणाऱ्यांच्या बुद्धीची खरेतर कीव करावीशी वाटते 'जननी जन्म भूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।।' हे हजारो वर्षांपूर्वी लिहिलेल्या वाल्मिकी रामायणातील वाक्य आहे, याचा अर्थ आई आणि मातृभूमी हे दोन्हीही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत. जन्मदात्या आईनंतर श्रेष्ठ कोणी असेल तर ती मातृभूमी आहे त्यामुळे तिला वंदन करणे हे या मातृभूमीत राहणाऱ्या प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे हें लक्षात घेऊन केवळ एक-दोन राज्यांत नव्हे तर केंद्र सरकारने आपल्या अधिकारांचा वापर करत भारतातील समस्त शाळांमध्ये प्रतिदिन 'वंदे मातरम' गीत म्हणणे बंधनकारक करावे ! हीच खरी क्रांतिकारकांच्या प्रति श्रद्धांजली असेल !'

**- सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## डोंबिवली पोलीस ठाण्याची मोठी कामगिरी; ३३ हरवलेले मोबाईल परत

### एकूण ५.५० लाख रुपयांचे मोबाईल नागरिकांना परत मिळाल्याने समाधानाचा श्वास



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१२, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पोलिस ठाण्याच्या दक्ष तपास पथकाने हरवलेले आणि चोरी गेलेले तब्बल ३३ मोबाईल फोन शोधून काढत पुन्हा मालकांच्या हाती सोपवले आहेत. या मोबाईलची एकूण किंमत सुमारे ₹५,५०,००० इतकी आहे. हे मोबाईल उएखठ पोर्टलच्या माध्यमातून शोधण्यात आले असून बुधवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलिस ठाणे डोंबिवली येथे तक्रारदारांना त्यांच्या मोबाईलचे वितरण करण्यात आले. ही कारवाई उपायुक्त अतुल झेंडे व सहाय्यक पोलिस आयुक्त सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्या नेतृत्वात पार पडली. मोबाईलचे वितरण वपोनि गणेश जवादवाड, पोनि गौड, पोनि भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. तक्रारदारांनी पोलिसांकडून आपले हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने अत्यंत समाधान व्यक्त केले. विशेष म्हणजे, एका गरीब महिलेला – जिने एक वर्षभर कष्ट करून आयुष्यातील पहिला मोबाईल विकत घेतला होता – तो हरवला होता. आज तो मोबाईल परत मिळाल्यावर तिच्या डोळ्यात अश्रू दाटले. तसेच एका कॅन्सरग्रस्त महिलेलाही तिचा मोबाईल परत मिळाल्याने दिलासा मिळाला, तर एका मुलाने आपल्या आईसाठी गिफ्ट म्हणून घेतलेला मोबाईल परत मिळाल्याने आनंद व्यक्त केला. ही संपूर्ण कामगिरी सपोनि अच्युत मुपडे, पोउपनि चव्हाण तसेच पोशि/८४१३ सांगळे यांच्या तपास पथकाने केली. डोंबिवली पोलिसांच्या या कार्यामुळे नागरिकांमध्ये विश्वास आणि समाधानाची भावना अधिक दृढ झाली असून, लोकांनी पोलिसांचे मनः पूर्वक आभार मानले आहेत.

## समता नगर गोळवलीत कचऱ्याचा प्रश्न चिघळला

### सुमित एल्कोप्लास्ट कंपनीविरोधात युवकांचे आंदोलन



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१२, कल्याण (ठाणे) :** कल्याण – डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १७ मधील समता नगर, गोळवली परिसरात गेल्या महिनाभरापासून कचरा उचलण्याचे काम ठप्प झाले आहे. नागरिकांच्या वारंवार तक्रारींनंतरही कंत्राटदार सुमित एल्कोप्लास्ट कंपनीकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, अशी स्थानिकांची नाराजी आहे. कंपनीकडून आमच्याकडे माणसं नाहीत आणि GCP उपलब्ध नाही अशी कारणे देत जबाबदारी टाळण्यात येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिणामी परिसरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचले असून दुर्गंधी, डासांचे प्रमाण आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या परिस्थितीला कंटाळून स्थानिक युवकांनी कचऱ्यात बसून आंदोलन छेडले. त्यांनी सुमित एल्कोप्लास्ट कंपनीचा निषेध नोंदवत महानगरपालिकेकडे तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. आंदोलकांनी सांगितले की,आम्ही गेल्या महिन्यापासून तक्रार करत आहोत, पण कोणीही ऐकून घेत नाही. नागरिकांनी काय कचऱ्यातच राहायचं का? महानगरपालिका आणि कंत्राटदाराने तत्काळ कारवाई करावी, अन्यथा आम्ही पुढील तीव्र आंदोलन करू.या घाण व अस्वच्छतेमुळे शेजारच्या शाळा व रहिवाशांनाही त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांनी महानगरपालिका आयुक्तांकडे तातडीने हस्तक्षेप करून कचरा उचलण्याची नियमित व्यवस्था सुरू करण्याची मागणी केली आहे.


## ✲ जाहीर नोटीस ✲

खाली परिशिष्टांत नमुद केलेली मिळकत ही राहुल राजकुमार आचार्य व संतोषी राहुल आचार्य यांच्या मालकी वहिवाटीची असून सदर मिळकत आमचे अशिलांना मालकी तत्वावर विकत देण्याचे विद्यमान मालकांनी मान्य व कबूल करून विसार रक्कम घेतली आहे. सदर परिशिष्ट मिळकत संपूर्णपणे निर्वेध व बोजारहीत असल्याचे व मिळकत विक्री करणेबाबत मालकी हक्क व मार्केटेबल टायटल असल्याचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. तथापी सदर मिळकतीत कोणाचाही, कसलाही, गहाण, दान, बक्षिस, जप्ती, जामीनकी, अन्नवस्त्र, पोटगी, भाडेकरार, लिज, लिन, लायसेन्स, साठेखत, करारनामा, समजुतीचा करारनामा (ओम ओ यु) बोजा अगर इतर कोणताही मालकी हक्क, हितसंबध वा अधिकार असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाले पासून ८ (आठ) दिवसांचे मुदतीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी आमची खात्री करून देणेची आहे. सदरील मुदतीत कोणाचीही, कोणतीही व कसलीही लेखी हरकत न आल्यास सदरील परिशिष्ट मिळकत संपूर्णतः निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून मुदतीनंतर आमचे अशिल मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही, कोणतीही व कसलीही तक्रार/ हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेली आहे असे समजून विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, दुय्यम निबंधक साहेब यांचे हद्दीतील व पुणे महानगरपालि हद्दीतील गाव मौजे पेरणे ता. हवेली, जि.पुणे येथील गट नंबर ९८२ या जमीन मिळकतीवर बांधण्यात आलेल्या मिळकतीमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २२ यांसी क्षेत्र ७१२ चौ. फुट ही मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय असे.

पुणे
१२/११/०२५

राहुल बाळासाहेब गायकवाड
(बी.ए.एल.एल.बी)
ॲडव्होकेट
निवास-स.नं. ३२/१, शेलार मळा,
के. के. रोड, पेठारकर घराजवळ, कात्रज, पुणे- ४११०४६
मो. नं. ८४१२०१३८९५


# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला दिव्यांग कर्मचाऱ्यांचा आढावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नांदेड :** प्रत्येक कार्यालयात दिव्यांग आरक्षणाअंतर्गत अधिकारी, कर्मचारी कार्यरत आहेत. या दिव्यांग कर्मचाऱ्यांनी आतापर्यंत कार्यालयास दिव्यांगत्वाची प्रमाणपत्र, वैश्विक ओळखपत्र सादर केले आहे किंवा नाही याबाबतची सर्व माहिती विभाग प्रमुखांनी तात्काळ जिल्हा प्रशासनाकडे सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.



दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमान्वये दिव्यांग वैश्विक ओळखपत्र (युडीआयडी) अनिवार्य काढणेबाबत बैठक संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे, उपजिल्हाधिकारी सामान्य अजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधुत गंजेवार, शिक्षणाधिकारी योजना दिलीप बनसोडे यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.प्रत्येक विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र, वैश्विक ओळखपत्र कार्यालयास सादर केले आहे किंवा नाही याची तपासणी करुन त्यांच्या दिव्यांगत्वाची पडताळणी करण्यात येणार आहे. जे अधिकारी-कर्मचारी यांनी वैश्विक ओळखपत्र सादर केले नाही, पडताळणी अंती ज्यांचे दिव्यांगत्वाची टक्केवारी ४० टक्के पेक्षा कमी आहे, ज्यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र बोगस आढळून आले अशा सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे विरुद्ध दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ९१ नुसार कारवाई करावी किंवा त्यांनी घेतलेल्या लाभाची वसुली करण्याबाबत निर्देश आहेत.

त्यामुळे सर्व विभाग प्रमुखांनी तात्काळ गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत कार्यालयात, विभागात किती दिव्यांग आहेत. त्यापैकी किती जणांकडे युडीआयडी कार्ड आहेत. किती जणांनी सादर केले आहेत. अद्याप सादर न करणाऱ्यांची संख्या किती आहे याबाबतची सर्व माहिती तात्काळ उपजिल्हाधिकारी सामान्य, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री.कर्डिले यांनी दिले. सर्व विभागांनी माहिती सादर केल्यानंतर जिल्हा प्रशासनाच्यावतीने हे ओळखपत्र पडताळणीसाठी विशेष कॅम्पचे लवकरच आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत असलेले दिव्यांग अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यालयास सादर केलेल्या दिव्यांगत्वाचे वैश्विक ओळखपत्र प्रमाणपत्राची तपासणीची कार्यवाही सुरु असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी यावेळी दिली. या तपासणीत दोषी आढळून आलेल्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधुत गंजेवार यांनी दिव्यांगांच्या विविध विषयाच्या अनुषंगाने सादरीकरणाद्वारे माहिती दिली. यावेळी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ३९ अन्वये दिव्यांगाप्रती तसेच जेष्ठ नागरिक कायदा २००७ अन्वये जेष्ठ नागरिकाप्रती संवेदनशिलता जागृती कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

## बिबट्याला ठार करा या मागणीसाठी विद्यार्थी व ग्रामस्थांचा संताप

### देवगाव येथे रास्ता रोको आंदोलन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील देवगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून भीतीचं वातावरण निर्माण करणारा नरभक्षक बिबट्या अखेर दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे वनविभागाच्या पिंजऱ्यात जेरबंद झाला. मात्र, बिबट्या पकडला गेल्यानंतरही ग्रामस्थ व विद्यार्थी यांचा रोष ओसरण्याचं नाव घेत नाही. बिबट्याने गेल्या काही दिवसांत जनावरांवर तसेच मानवांवर हल्ले केल्याने गावकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे आज सकाळी बिबट्या पिंजऱ्यात कैद झाल्यानंतर संतप्त ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी हा बिबट्या ठार मारल्याशिवाय आम्ही थांबणार नाही असा निर्धार करत रस्ता रोको आंदोलन सुरू केले. आंदोलना दरम्यान विद्यार्थ्यांनी वनविभागाच्या पथकाला आणि पोलिसांना घेराव घातला. पिंजऱ्यातील बिबट्याला वनविभागाने रेस्क्यू व्हॅनद्वारे अन्यत्र हलवण्याचा प्रयत्न केला असता, नागरिक आणि विद्यार्थ्यांनी त्यास ठाम विरोध दर्शवला. जोपर्यंत बिबट्या ठार मारत नाही, तोपर्यंत एकही विद्यार्थी शाळेत जाणार नाही! असा इशारा आंदोलकांनी दिला आहे. घटनास्थळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ, विद्यार्थी, तसेच पोलिस व वनविभागाचे अधिकारी उपस्थित आहेत. परिस्थिती तणावपूर्ण असून आंदोलकांच्या मागणीचा तोडगा काढण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत.

## पेण वरसई फाटा येथे गुरे चोरी करणाऱ्या टोळीला अटक



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१२, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील वरसई फाटा येथे गुरे चोरी करणारी टोळी रात्री दीडच्या सुमारास महिंद्रा झायलो आणि इको या दोन गाड्यांमधून अज्ञाताची गुरे अवैधरित्या घेऊन जात असल्याचे आढळून आल्याने सदर आरोपींना पेण पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडे गावठी जातीचे ४ गुरे तसेच २ वाहने असे एकूण ५ लाख ८७ हजार २१० रुपयांचा मुद्देमाल पेण पोलिसांनी जप्त केले आहे.

सविस्तर वृत्त असे की, पेण तालुक्यातील वरसई फाटा येथे महिंद्रा झायलो एम एच ०३ ए आर ६२१४ व इको एम एच ४६ सी एच ६५४० या दोन्ही गाड्या कुठूनतरी जनावरे चोरी करून अवैध्य मार्गाने स्वतःच्या आर्थिक लाभासाठी जनावरे वाहनात कोंबून कोणतंही परवाना नसताना कत्तलीच्या उद्देशाने घेऊन जात असल्याची माहिती फिर्यादी यांच्याकडून रात्री दीडच्या सुमारास मिळाली असता त्या ठिकाणी धाड टाकली असता यातील आरोपी शरीफ रफिक अन्सारी, इम्रान मलंग पटेल, सलमान अब्दुल पटेल, सोनू जुबेर खान, बाजल राशिद शेख या पाच जणांना मुद्देमालासह पकडले असून अजीज शेख (रा. तळोजा) हा आरोपी फरार आहे. संबंधित आरोपींवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून याबाबतचा अधिक तपास पोलिस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रम नवरखेडे व सोमनाथ घोलप करत आहेत.

## विसापूर येथील आरोग्य केंद्राला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, चंद्रपूर :** बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी बुधवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी भेट दिली. यावेळी त्यांनी आरोग्य केंद्रातील विविध कक्षाची प्रत्यक्ष पाहणी करुन नागरिकांना सुलभ आरोग्य सेवा देण्याच्या सूचना आरोग्य अधिकाऱ्यांना दिल्या. दरम्यान जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हे पहिल्यांदाच विसापूर येथे भेट दिल्याबद्दल ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आदरातिथ्य करून रेल्वे समस्या बाबत निवेदन सादर केले.



जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्यासोबत बल्लारपूर चे उपविभागीय अधिकारी अजय चरडे, तहसीलदार रेणुका कोकाटे, चंद्रपूर चे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, तालुका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.मिना मडावी, प्राथमिक आरोग्य अधिकारी डॉ.अविशा मडावी, विसापूर येथील सरपंच वर्षा कुळमेथे, उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, ग्रामपंचायत अधिकारी गणेश कोकोडे, मंडळ अधिकारी किशोर नवले यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी स्मार्ट आरोग्य केंद्र करण्याच्या अनुषंगाने आरोग्य केंद्रातील पाणी गळती, ऑपरेशन कक्ष सुधारणा, विज जोडणी, सोलर पॅनल अद्यावत करण्यासाठी उपाययोजना, शौचालय अद्यावत व स्वच्छ ठेवण्याबाबत आरोग्य अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आली. दरम्यान विसापूर ग्रामपंचायत कार्यालय मध्ये त्यांनी भेट दिली.

यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ प्रदान सरपंच वर्षा कुळमेथे, उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य रिना कांबळे, प्रदीप गेडाम, ग्रामपंचायत अधिकारी गणेश कोकोडे आदींनी जिल्हाधिकाऱ्यांचे आदरातिथ्य केले. यावेळी भूमिगत रेल्वे मार्गाची दयनिय अवस्था झाली आहे. विज दिव्याची व्यवस्था नाही. उड्डाणपूल गावाला आवश्यक आहे. पावसाळ्यात रेल्वे पुलातून आवागमन करण्यासाठी नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागतो. ही समस्या निवेदन सादर करून जिल्हाधिकाऱ्यांकडे मांडण्यात आली. यावेळी त्यांनी सकारात्मक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

## नवीन पनवेल मधील रस्ते दुरूस्तीला वेग

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, पनवेल :** आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्वच प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे जोमाने सुरू आहेत. नुकतीच पनवेल प्रभागातील रस्त्यांची अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी प्रत्यक्ष पहाणी केली होती.

त्यानूसार रस्ते दुरूस्तीच्या कामास वेग देण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या त्यानूसार नवीन पनवेल मधील रस्ते दुरूस्ती कामे वेगाने केली जात आहेत. नवीन पनवेलमधील एचडीएफसी सर्कल ते डी मार्ट रोड पाऊसामुळे अत्यंत खराब झाला होता. या



रस्त्याचे डांबरीकरण वेगाने सुरू आहे. नुकत्याच झालेल्या बैठकित आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी खराब झालेल्या रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी तात्काळ रस्ते दुरूस्ती करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचित केले होते. शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागामध्ये कनिष्ठ अभियंत्याच्या देखरेखीखाली रस्ते दुरूस्तीची कामे केली जात आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील तळोजा, नवीन पनवेल, खारमधील आवे पेठ, खारघरमध्ये सेक्टर ३४ फुटबॉल मैदान, सेक्टर २०, शिल्प चौक ते तवा जंक्शन, कामोठेमधील मानसरोवर स्थानकाकडून शहराकडे जाणारा रस्ता अशा विविध ठिकाणी सध्या रस्ते दुरूस्तीची कामे जोरात सुरू आहेत.

# स्वराज्य स्पोर्ट्स, महात्मा गांधी स्पोर्ट्स कुमारी गटात पूर्व व पश्चिम विभागात अंतिम विजेते

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१२, मुंबई :** मुंबई उपनगर कबड्डी असो.ने आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत स्वराज्य स्पोर्ट्स,महात्मा गांधी स्पोर्ट्स कुमारी गटात अनुक्रमे पूर्व व पश्चिम विभागात विजेतेपद पटकाविले. गजानन मंडळ व पार्ले महोत्सव स्पोर्ट्स् अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आम दार पराग आळवणी, आयोजक मिलिंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार्ले येथील प्ले-ग्राउंड वर हे सामने संपन्न झाले. पूर्व विभागातील कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात कांजूरच्या स्वराज्य स्पोर्ट्स् ने कुर्ल्याच्या एस.आय.इ.एस.चा ४७-२२ असा पराभव करीत विजेते पदाला गवसणी घातली.




आंतरराष्ट्रीय खेळाडू सेरेना म्हसकरचा धुव्वादार खेळ तिला सानिया इंगळे, मधुरा सावंत, नेहा पांडव, सारा येवले, मुद्रा पाटील यांची मिळालेली चढाई पकडीची साथ, या सर्वांच्या सांघिक खेळामुळे स्वराज्यने विश्रांतीला २४-०४ अशी भक्कम आघाडी घेतली होती. विश्रांतीनंतर मात्र एस.आय.इ. एस.च्या आस्था सिंग,तनुश्री शिंदे यांनी आपला खेळ उंचावत कडवी लढत दिली. पण संघाला विजेतेपद मिळवून देण्यात त्या कमी पडल्या. पश्चिम विभागातील कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात बांद्राच्या महात्मा गांधी स्पोर्ट्स् ने मालाडच्या आकाश मंडळाला ३९-१७ असे नमवीत जेतेपदाचा चषक उंचावला. पूर्वार्धात १९-०७ अशी आघाडी घेणाऱ्या महात्माने उत्तरार्धात देखील आपल्या खेळाची गती कायम राखत आपला विजय सोपा केला. पूजा चिंदरकर, प्रतिक्षा सर्वसाने यांच्या चढाई पकडीच्या सर्वांगसुंदर खेळाला याचे श्रेय जाते. आकाशच्या तन्वी बारगुडे, शलाका मर्डेकर बऱ्या खेळल्या.

या अगोदर झालेल्या कुमारी गटाच्या पूर्व विभागात स्वराज्य स्पोर्ट्स् ने स्नेहविकासचा ५२-१७ असा,तर एस.आय.इ. एस.ने शिवकन्या मंडळाचा ३०-०६ असा पराभव करीत अंतिम फेरी गाठली. पश्चिम विभागातील कुमारी गटाच्या उपांत्य फेरीत महात्मा गांधीने माऊली प्रतिष्ठानला ३५-०८ असेल तर आकाश स्पोर्ट्स् ने निवारा हिड इंडियला ३२-१२ असे नमवीत अंतिम फेरीत धडक दिली होती.या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ स्पर्धा आयोजक मिलिंद शिंदे, समाजसेविका मनीषा शिंदे, जिल्हा संघटनेचे कार्याध्यक्ष सुधाकर घाग, सचिव राजेश पडेलकर व मुंबई उपनगर सर्व कार्यकारिणी सदस्य यांच्या उपस्थितीत पार पडला.

# पेणची रिया कांबळे ठरली मिस रायगड २०२५ ची विजेती

## तर अलिबागची प्रिया पाटील द्वितिय क्रमांकाची मानकरी




**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१२. पेण (रायगड) :** स्वरंग पेण तर्फे आयोजित केलेल्या पेण फेस्टिवल २०२५ मध्ये दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या सर्वात मोठ्या मिस रायगड स्पर्धेत पेणची रिया दिनेश कांबळे ही मिस रायगडची अंतिम विजेती ठरली. तर अलिबागची प्रिया विजय पाटील या स्पर्धेतील फस्ट रनरअप तर नवी मुंबईची यशस्विनी परशुराम पाटील हिने सेकंड रनरअपचे पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेतील बेस्ट कॅटवॉक सृष्टी कांचन पेरवी (दादर), बेस्ट पर्सनालीटी यामिनी गणेश पाटील (पेण), बेस्ट स्म ईल मनस्वी किशोर लोहार (पेण), बेस्ट हेअर प्रतिभा विजय वाघमारे (पेण), बेस्ट फोटोजनिक तन्वी संतोष पाटील, बेस्ट कॉस्च्यूम अपूर्वा रवींद्र पाटील (पेण) या स्पर्धकांनी पारितोषिके जिंकली. या स्पर्धेत संपूर्ण रायगड जिल्ह्यातून एकूण १८ सौदर्यवतींनी सहभाग घेतला होता. सर्वांनीच आपल्या मनमोहक अदा सादर करून रसिकांना मोहित केले.

या स्पर्धेसाठी रसिकांनी विशेषता युवा वर्गाची मोठी उपस्थिती दर्शविल्याने स्टेज समोरील प्रांगण खचाखच भरले होते. सर्व विजेत्यांना शर्मिला पाटील, प्रीतम पाटील, पेण फेस्टिवल स्वरंग पेण चे अध्यक्ष राजेंद्र साळवी, पेणचे प्रसिध्द उद्योजक नरेश जैन, खजिनदार भारती साळवी, उपाध्यक्ष सुनिल पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, अक्षता सावंत, अनिकेत साळवी, अथर्व सावंत, मृगज कुंभार, अनिरुद्ध पवार, सारिका पाटील, नेहा कुंभार, निशा साळवी, यश बांदीवडेकर, प्रसाद म्हात्रे, सृष्टी सूर्यवंशी, प्रेरणा रामधरणे, तन्वी रामधरणे, प्रशांत पाटेकर, दर्शना पाटेकर, आदि मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. मिस रायगड २०२५ मध्ये साडी राउंड, वेस्टन राउंड व ईव्हीनींग गाउन राउंड अशा तीन राऊंडम ध्ये सादर करण्यात आलेल्या या स्पर्धे ची कोरिओग्राफी रुपेश चव्हाण, मुंबई व सहाय्यक कोरिओग्राफर निखिल बाचल यांनी साकारली. तर टीव्ही अँकर ऋषी देसाई यांच्या उत्कृष्ठ समालोचनाची साथ या स्पर्धेला लाभली. तर परिक्षक म्हणून वडापाव सिनेमा लेखक सिद्धार्थ साळवी, डॉ.माधवी ठाकूर, डॉ.आरती चेंदवणकर, प्रो.अक्षता साळवी यांनी काम पाहिले. यावेळी पेण फेस्टिवल २०२५ला ज्या जाहिरातदार यानी दिलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. सर्वांसाठी सर्वकाही ही संकल्पना असलेल्या पेण फेस्टिवलला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे स्वरंगचे अध्यक्ष राजेंद्र साळवी यांनी सांगितले.

# ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामाबाबत आढावा बैठक संपन्न

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१२, ठाणे :** गायमुख घाटाचे पुनर्पृष्ठीकरण, घोडबंदर सेवा रस्ता जोडणी, अमृत जलवाहिनी टाकणे आणि महावितरणच्या वाहिन्यांचे स्थलांतरण ही सर्व कामे पूर्ण होऊन नवीन वर्षात जानेवारी २०२६ मध्ये घोडबंदर रस्ता पूर्णपणे वाहतूक कोंडीमुक्त होईल, असा विश्वास ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास काम ांबाबत घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत व्यक्त केला. घोडबंदर रोडवरील विविध समस्यांबाबत जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी या बैठकीत सादरीकरण केले. त्याचा आढावा घेतल्यानंतर एमएमआरडीए, म हापालिका, मेट्रो आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून रस्त्यावरील कामांच्या स्थितीची माहिती घेतली. गायमुख घाटातील ठाणे महापालिका हद्दीतील रस्त्यांच्या पुनर्पृष्ठीकरणाचे काम वाहतूक पोलिसांशी सम न्वय साधून केले जाणार आहे. त्याचवेळी, जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी सुचवल्याप्रमाणे घोडबंदर रस्त्यावरील सर्व उड्डाणपुलावरील रस्त्याची डागडुजी, पुनर्पृष्ठीकरण एकाचवेळी हाती घेऊन पूर्ण केले जावे, असे निर्देश दिले.

त्याचबरोबर, गायमुख घाटाच्या पुनर्पृष्ठीकरणाचे काम पूर्ण झाल्यावर घोडबंदर रस्ता ठाणे महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ठाणे महानगरपालिकेस दिले. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या आणि आता अंतिम टप्प्यात असलेल्या विविध विकास कामांचे लोकार्पण नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस तसेच डिसेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत करण्यात येईल.

तसेच ओवळा माजिवडा मतदार संघातील



विविध विकास कामांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. यावेळी महापालिका आयुक्त सौरभ राव, एमएमआरडीएचे सह महानगर आयुक्त आस्तिक कुमार पाण्डये, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, पोलीस उपायुक्त (वाहतुक) पंकज शिरसाट, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, म्हाडा आदी विभागांचे अधिकारी, जस्टिस फॉर घोडबंदर रोडचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# सबर्बन मुंबईचा तायक्वाँदो कॅडेट संघ जाहीर

## जिल्हा स्पर्धा उत्साहात; राज्य स्पर्धेत करणार प्रतिनिधित्व

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१२, मुंबई :** तायक्वाँदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई या अधिकृत संघटनेशी संलग्न असलेल्या तायक्वाँदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई या संघटनेच्या वतीने ८वी जिल्हास्तरीय तायक्वाँदो स्पर्धा आयोजित करून त्यामधील सुवर्णपदक विजेते खेळाडू राज्य तायक्वाँदो स्पर्धेत सबर्बन मुंबई जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत, अशी माहिती सचिव संदिप चव्हाण यांनी दिली.



तायक्वाँदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई तर्फे नुकताच सेंट अँथनी हायस्कूल, साकीनाका येथे जिल्हा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत २०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.हि स्पर्धा आधुनिक सेन्सर पद्धतीने घेण्यात आली. त्यामुळे संपूर्ण स्पर्धा पारदर्शक पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका लीडा सेंन्टीस, आंतरराष्ट्रीय पुमसे प्रशिक्षक रॉबिन मेंजेस तसेच तायक्वाँदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबईचे पदाधिकारी संदीप येवले (अध्यक्ष), संदीप चव्हाण (सचिव), कल्पेश गोलांबडे (खजिनदार) आणि संतोष कुंभार (सदस्य), जगदीशअंचन यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी सर्व मान्यवरांनी खेळाडूंना शुभेच्छा देत प्रोत्साहन दिले. तायक्वाँदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई या अधिकृत संघटनेचे अध्यक्ष अविनाश बारगंजे, महासचिव मिलिंद पाठारे, खजिनदार व्यंकटेश करारा, सचिव सुभाष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या अधिकृत स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

सर्व निवड झालेल्या खेळाडूंचे राज्य संघटनेच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

**निवड झालेला पुमसे संघ :-**

**कॅडेट वैयक्तिक :-** अभिजीत देदीनाथ, महिमा थापा

**पेअर (कॅडेट) :-** अभिजीत देदीनाथ, अलिजा शेख

**ग्रुप (कॅडेट मुले) :-** अथर्व सावंत, साहस भोजे, रुद्र रसाळ

**ग्रुप (कॅडेट मुली) :-** आद्या शर्मा, अलिजा शेख, महिमा थापा

**क्योरेगी संघ मुले :-** तेजस भंडारी, संस्कार धोपटे, तनिष परब, अद्वेत रेडेकर, रोहन चव्हाण, पार्थ दामसे, रुद्र गोडसे, यश कारखेले, साहस भोजे .

**क्योरेगी संघ मुली :-** मोना रजक, आरोही दास, वेदा मोरे, शरीका खान, पलक दामसे, आफ्रिन शेख, साईशा शहाणे, दित्या पसुपुला, श्रीष्टी यादव, स्वरा खडमळे

# थोडक्यात

## कर्नाळा नागरी सहकारी बँकेकडील ठेवीदारांच्या ठेवींबाबत सहकार विभागाने पुढाकार घ्यावा- सहकार मंत्री



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, मुंबई :** कर्नाळा नागरी सहकारी बँक लिमिटेडच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत देण्यासाठी सहकार विभागाने पुढाकार घ्यावा. या बँकेच्या जप्त मालमत्ता, कायदेशीर प्रकरणे या संदर्भात मुख्यमंत्री यांच्याकडे बैठकीचे आयोजन केले जाईल असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या दालनात झालेल्या बैठकीच्या वेळी आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, सह सचिव संतोष पाटील आदी उपस्थित होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले, बँकेच्या ठेवीदारांना ठेवी परत देण्यासाठी बँकेच्या ज्या मालमत्तासंदर्भात न्यायालयीन प्रकरणे सुरू आहेत यासंदर्भात देखील सहकार विभागाने आवश्यक तो पाठपुरावा करावा. एमपीआयडी यांच्याकडील विषया संदर्भात कायदेशीर सल्ला घेण्यात यावा.

## महाराष्ट्र विद्यालयाची ज्युदोपटू रिधीमाने पटकावले कांस्यपदक



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१२, नागपूर :** नुकत्याच शिवछत्रपती क्रीडा संकुल, महाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे संपन्न झालेल्या शालेय राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाची ज्युदोपटू रिधीमा सुधाकर वासनिक हिने उल्लेखनीय कामगिरी करून शालेय राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. रिधीमाने १९ वर्षा खालील वयोगटात मुलीमध्ये ३६ किलो वजन गटात सहभाग घेऊन तृतीय क्रमांक प्राप्त करुन कांस्यपदकाची मानकरी ठरली. रिधीमा ही खेळासोबतच अभ्यासात सुद्धा ही अग्रेसर आहे. बारावी या वर्गात शिकत असणारी रिधिमा २०२३-२४ या सत्रामध्ये एस.एस.सी. बोर्ड परीक्षा मध्ये शाळांमधून प्रथम क्रम ांकाने पास झालेली होती. रिधीमा सोबतच उन्नती भोसकर व प्रांजल बर्वे या ज्युदो पटूंनी सुध्दा राज्यस्तरीय ज्युदोस्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे सुनील केदार, सचिव सुहासताई केदार, सुधिर केदार व संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार, प्रा.विजय टेकाडे, क्रीडाशिक्षक धर्मेद्र सुर्यवंशी, धैर्यशील सुटे व सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने खेळाडूंचे अभिनंदन केले.

## डॉ.बन यांच्याकडून आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१२, तलासरी (पालघर) :** ग्रामीण आणि आदिवासी भागातील अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अजूनही हलाखीची आहे. त्यामुळे अनेक वेळा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य खरेदी करताना अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांकडून मिळणारे सहकार्य या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच सामाजिक बांधिलकीतून डॉ.योगेश सुभाष बन या सामाजिक कार्यकर्त्यांनी एक स्तुत्य उपक्रम राबवला. तलासरी तालुक्यातील निर्मला विद्यालय, कुर्झे येथील ३५५ आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांनी वह्या, दप्तर, ड्रॉइंग बुक, पेन्सिल, शार्पनर, खोडरबर, पट्ट्या आदी शैक्षणिक साहित्य वाटप केले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ.बन यांनी म्हटले की, शिक्षण हेच जीवन बदलण्याचं सर्वात मोठं साधन आहे. स्पर्धा परीक्षांमधून अधिकारी होऊन आपण आपल्या कुटुंबाचे, गावाचे, समाजाचे आणि तालुक्याचे नाव उज्वल करू शकतो. त्यांनी विद्यार्थ्यांना मोठे स्वप्न पाहण्याचे आणि सातत्याने प्रयत्न करत राहण्याचे आवाहन केले. तसेच या उपक्रमाचे यश परमेश्वराची कृपा, आई-वडिलांचे आशीर्वाद आणि आनंद भाई ठाकूर यांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह पाहून उपस्थितांचे मन भारावून गेले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा प्रकारचे उपक्रम सतत राबवले जाण्याची गरज असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रमेश नागुडे, संस्थापिका शनी देवी मिश्रा, दयाराम मिश्रा, डॉ.रवींद्र मिश्रा, डॉ.योगेश बन, कांचन मिश्रा, काशिनाथ कुर्करे उपस्थित होते.

## आठवडी बाजारात दुकाने, वाहने रस्त्यावर लावणाऱ्यावर कारवाईची मागणी



**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१२, शहापूर (ठाणे) :** कृषी उत्पन्न बाजार समिती शहापूर आठवडी बाजारात शहापूर तालुक्यासह बाहेरील शेतकरी, व्यापारी व ग्राहक मोठ्या प्रमाणात येत असतात.मात्र याठिकाणी अनेक दुकाने व गाड्या नियबाह्य पद्धतीने राष्ट्रीय महामार्गा लगत लागलेली असतात.

यामुळे याठिकाणी अनेक अपघात होतात. भविष्यात याठिकाणी मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती, सभापती नंदकुमार डोहळे व उपसभापती शरद वेखंडे, तहसीलदार, पोलिस निरीक्षक, शहापूर व गोठेघर ग्रामपंचायत यांना एक निवेदनाद्वारे याठिकाणी दुकाने व वाहने पार्किंग न करता त्यावर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. यावेळी प्रहार तालुका अध्यक्ष वसंत पानसरे, सचिव विनायक बोऱ्हे, युवा संघटक मयूर किरपण व युवा सहसचिव निलेश बोटकोंडळे आदी उपस्थित होते.